Estd. 1962

"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषय :- सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामधील इतर फी (Other Fee), रजिट्रेशन फी (पदव्युत्तर प्रवेश नोंदणी शुल्क) व वार्षिक संलग्नीकरण शुल्काबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे जा.क्र.शिवाजी वि./संलग्नता/टी-२/शासन टे./२०२६-२७/१२२५, दि.०७/०७/२०२६ रोजीचे परिपत्रक.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक संलग्नीकरण शुल्क ३१ जुलै, २०२६ पर्यंत भरलेले नाही अशा महाविद्यालयांनी मुळ वार्षिक संलग्नीकरण शुल्क + खालील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे विलंब शुल्क भरुन या कार्यालयास शुल्क पावती जमा करावी. तसेच महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे नोंदणी शुल्क अद्यापही काही महाविद्यालयांनी भरलेले दिसून येत नाहीत. अशा महाविद्यायांनी नोंदणी शुल्क भरुन कार्यालयास पावती सादर करावी. असे कळविण्यात आले होते.

वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरण्याचे शिर्षक :- **A.2.R.1.2**

| अ.क्र. | विलंब शुल्क आकारण्यात येणारा कालावधी | अंतिम तारखेपर्यंत |
|---|---|---|
| १. | ०१ ऑगस्ट, २०२६ ते ३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत | विहित शुल्क + विहित शुल्काच्या १०% |

१. वार्षिक संलग्नीकरण शुल्क + वरील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे विलंब शुल्क भरून त्याची पावती कव्हरींग लेटरसह विद्यापीठ कार्यालयास (संलग्नता टी-२ विभागास) सादर करावी.

२. महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे नोंदणी शुल्काबाबत विषयानुसार विद्यार्थीची यादी तयार करुन शुल्क भरावे व त्याची पावती व विद्यार्थ्यांच्या नावांची यादी विद्यापीठ कार्यालयास (संलग्नता टी-२ विभागास) सादर करावी.

३. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारी इतर फी (other Fee) विद्यापीठ कार्यालयास (संलग्नता टी-२ विभागास) कव्हरींग लेटरसह पावती जमा करावी. **(पत्रामध्ये विद्यार्थी संख्या नमूद करावी.)**

४. तसेच ज्या महाविद्यालयांनी सदरचे शुल्क भरलेले आहे अशा महाविद्यालयांनी परिपत्रकानुसार सदरचे शुल्क भरणेची आवश्यकता नाही.

सबब, उपरोक्त १, २ व ३ बाबतचे शुल्क भरल्यानंतरच जून २०२७ पासूनच्या संलग्नीकरणाच्या प्रस्तावाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

श्री. दिपक द. अडगळे
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/शा.टे./ No 1364 / दि. 10 AUG 2026

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.